महाराष्ट्र शासन, कृषि विभाग

**आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य**

**"परंपरागत कृषि विकास योजना"**

**कृषि आयुक्तालय, कृषि भवन, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५**

फोन नं. ०२०-२५५३८४७५ ई-मेल आयडी-ddssst@gmail.com

**जाहिरात क्रमांक १/२०१९**

परंपरागत कृषि विकास योजना (PKVY) कार्यक्रमासाठी, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर,२०१६ नुसार विविक्षीत कामकाजासाठी कंत्राटी स्वरूपात राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या इच्छूक अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे.

**पदाचा तपशिल :-**

| अ. क्र | पदनाम | पद संख्या | अर्जदार ज्या पदाच्या वेतनश्रेणीतून सेवा निवृत्त झाला ती वेतन श्रेणी | अनुज्ञेय परिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| १ | **राज्यस्तरीय तांत्रिक समन्वयक** | ०१ | पीबी २ रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन -४६०० | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ अन्वये नमुद केल्याप्रमाणे. |

**१. राज्यस्तरीय तांत्रिक समन्वयक– ०१ (एक) पदे**

**१.१ शैक्षणिक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा :-**

- कृषि पदवी / कृषि पदव्युत्तर पदवी / उच्चतम कृषि पदवी
- महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- कृषि विभागातील आयुक्तालयीन /क्षेत्रीय कामाचा किमान २० वर्ष अनुभव असलेल्या व्यक्तिस प्रथम प्राधान्य.
- कृषि विषयक केंद्र पुरस्कृत योजना राबविणेचा अनुभव
- शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती विषयक योजनेचे तांत्रिक व तद्अनुषंगिक मार्गदर्शन करणे, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रेरणा देण्याची क्षमता असणे, राज्यस्तरावर योजना राबविण्याचा अनुभव आवश्यक.
- संगणकावर तसेच संगणक प्रणालीवर मराठी / इंग्रजी काम करण्याचा अनुभव.
- योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन करण्याच्या अनुषंगाने सांख्यिकी विषयक ज्ञान आवश्यक.
- करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती हि जास्तीत जास्त वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

**१.२ करावयाची विविक्षीत कामे :-**

- केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेनुसार योजनेच्या मार्गदर्शक सूचना तयार करणे.
- परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत प्रकल्प आधारित कामकाज करणे.
- क्षेत्रिय पातळीवर घटक निहाय सांख्यिकी पध्दतीने अहवालाचे संकलन करणे.
- योजनेकरिता निधी उपलब्ध करून घेण्याविषयी कामे व जिल्हा स्तरावर अनुदान वितरण करणे
- योजने अंतर्गत वार्षिक कृति आराखडा तयार करणे संदर्भात कामकाज पहाणे.
- योजनेचे जिल्हानिहाय संनियंत्रण व मुल्यमापन करणे.
- योजनेच्या जिल्हा स्तरावरील संकलित माहिती संगणक प्रणालीवर अद्यावत माहिती करणे.

- केंद्र व राज्यस्तरावरील पत्रव्यवहाराबाबत कामकाज करणे
- केंद्र व राज्य शासनाच्या विविध बैठकांसाठी योजनेविषयक टिपणी,सादरीकरण इ. कामे करणे.
- याशिवाय वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेप्रमाणे केंद्र व राज्य शासन स्तरावरील कामकाज पहाणे.

२. **कालावधी** :- १ वर्ष (जास्तीत जास्त ३ वर्षे पर्यंत)

३. **मासिक परिश्रमिक व भत्ते** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ अन्वये नमुद केल्याप्रमाणे.

३.१ **मासिक परिश्रमिक (मुद्दा क्र.२-ड १)** – महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून)

३.२ **भत्ते (मुद्दा क्र.२-ड २)** – उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक परिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय राहील.

३.३ **प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (मुद्दा क्र.२-ड ३)** :- करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरून प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**५. अटी व शर्ती**

१. हे नियमित पद नसुन ते विवक्षित कामासाठीच नियुक्ती करण्यात येणार आहे.

२. सदरील पदे भरल्यामुळे नियमित पदे भरण्यास कोणतीही अडचण राहणार नाही.

३. करार पध्दतीने भरण्यात येणा-या पदाचा कालावधी १ वर्ष असला तरी कामाची आवश्यकता पाहून जास्तीत जास्त ३ वर्षापर्यंत कालावधीत वाढविण्यात येईल.

४. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येणा-या व्यक्तीचे वय ६५ वर्षाच्या आत असावे.

५. सदर पदावर नियुक्ती झाल्यानंतर १ वर्ष कालावधीचे बंधपत्र/हमीपत्र करून देणे बंधनकारक राहील.

६. मुदती अगोदर सेवा सोडावयाची असल्यास १ महिना अगोदर कार्यालयास लेखी सुचना देणे बंधनकारक राहील.

७. कार्यालयास सेवेची आवश्यकता नसल्यास सेवा समाप्तीबाबत १ महिना अगोदर पुर्व सुचना देण्यात येईल.

८. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिका-यास शासकीय वेळेत नियमित कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

९. कार्यालयास आवश्यकता वाटल्यास कार्यालयीन वेळेनंतर व शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.

१०. सेवानिवृत्त अधिका-यांना करार पध्दतीने घेणेबाबत शासनस्तरावरून वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील.

११. या पदासाठी अर्ज करणा-या व निवडीची प्रक्रिया पुर्ण करणा-या उमेदवारास कंत्राटी पदावर कोणत्याही प्रकारे हक्क सांगता येणार नाही.

१२. उमेदवाराची निवड करणे, निवड रद्द करणे, कंत्राटी पदे कमी/जास्त करणे याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त, कृषि यांना राहतील.

१३. उमेदवाराची विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी. किंवा अशा प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २७१५/प्र.क्र.१०० /१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ मध्ये नमुद केलेल्या सर्व तरतुदी लागू राहतील.

**६. सर्वसाधारण सुचना :-**

१) अर्जदाराने त्यांचे अर्ज ए-४ साईज कागदावर टंकलिखीत किंवा स्वहस्ते सेवा तपशिलासह देणे आवश्यक आहे.

२) अर्जदाराने सोबतच्या विहीत प्रपत्रातील आवश्यक बाबी व इतर बाबींचा अर्जात उल्लेख करून अर्ज सादर करावा.

३) अर्जदारांनी त्यांचे अर्जात स्वतःचे नाव, सेवानिवृत्तीचे पद, सेवानिवृत्ती वेळची वेतनश्रेणी, जन्मतारीख, सेवानिवृत्तीची तारीख, शैक्षणिक अर्हता, शासकीय कामाचा अनुभव, विशेष उल्लेखनीय काम, निवृत्तीवेतन रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान आदेशाची छायांकीत प्रत जोडावी. तसेच पत्रव्यवहाराचा पत्ता, भ्रमणदूरध्वनी क्रमांक, आधार क्रमांक, पॅन क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी बाबी ठळक व अचुक नमुद करावयात)

४) पदाच्या समकक्ष वेतनश्रेणीमधूनच सेवानिवृत्त अधिकारी यांनीच आवेदन पत्र सादर करावे.

५) अर्जदाराचे परिपुर्ण अर्ज साक्षांकीत कागदपत्रासह दिनांक /०३/२०१९ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयास प्राप्त होतील अशा पध्दतीने पाठवावेत. (शासकीय सुट्टीच्या दिवशी अर्ज स्विकारले जाणार नाहीत)

६) संबंधितांनी त्यांचे अर्ज पोष्टाने अथवा स्वहस्ते अथवा ई-मेलद्वारे कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) पुणे, व्दारा कृषि उपसंचालक (मृद सर्वेक्षण व मृद चाचणी) कृषि आयुक्तालय, कृषि भवन, दुसरा मजला, पुणे-४११००५ या पत्यावर पाठवावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७) सविस्तर जाहिरात कृषि विभागाच्या **www.krushi.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर पहावी.

**दिनांकः** ०५/ ०३/२०१९
**स्थळ :** पुणे

**कृषि संचालक**
निविष्ठा व गुणनियंत्रण
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१

# अर्जाचा नमुना प्रपत्र

पदाचे नाव :-

| अ.क्र. | बाब | बाबीचा तपशिल | पुरावा कागदपत्रे सोबत आहे/नाही |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | | |
| २ | जन्म दिनांक | | |
| ३ | वय (अर्ज करतेवेळी) | | |
| ४ | शैक्षणिक पात्रता | | |
| ५ | सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत | | |
| ६ | सेवानिवृत्तीचे पद/ कार्यालय | | |
| ७ | सेवानिवृत्ती आदेश /से.पुस्तकातील नोंद | | |
| ८ | सेवानिवृत्ती वेळची वेतनश्रेणी | | |
| ९ | सेवानिवृत्ती वेतन रक्कम | | |
| १० | सेवानिवृत्ती वेतन आदेशाची प्रत | | |
| ११ | विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित/ शिक्षा बाबतची माहिती. | | |
| १२ | शासकीय कामाचा संक्षिप्त अनुभव | | |
| १३ | आधार क्रमांक | | |
| १४ | पॅन क्रमांक | | |
| १५ | पत्ता | | |
| १६ | पत्रव्यवहाराचा ई-मेल आयडी | | |
| १७ | भ्रमणदूरध्वनी क्रमांक | | |
| १८ | विशेष उल्लेखनीय कामे | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील दिलेली माहिती खात्री करून दिली असून ती खरी आहे.

स्थळ :-

दिनांक :-

स्वाक्षरी

अर्जदाराचे नाव